# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्र २७–२२ दिनांक ३१/०१/२०२२

## मित्राचा खून करुन पळून जाणा-या आरोपीतास १२ तासांच्या आत अटक करण्यास वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २८/०१/२०२२ रोजी रात्री ०९.०० वा. सुमारास दिनेश रमाकांत रावते वय २७ वर्षे यास स्वेटरच्या लेसच्या सहाय्याने गळा आवळुन जिवे ठार मारलेबाबत त्याचा मित्र किरण काकडया हिंगा याचे विरोधात वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. I १०२/२०२२ भादंविस कलम ३०२ अन्वये दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिका-यांनी लागलीच वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदारांना तपासाच्या सुचना केल्या. वरिष्ठांच्या सुचनांना अनुसरुन वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदारांनी गुप्त बातमीदारामार्फत आरोपीतास यशस्वीरित्या वेळ न दवडता ताब्यात घेवून त्याचेकडे विचारपूस केली असता अंतिमतः त्याने गुन्हाची कबूली दिली.

आरोपीताकडे केलेल्या चौकशीत माहिती समजून आली की अटक आरोपीताची पत्नी त्याचा मित्र तथा मयत दिनेश रमाकांत रावते याच्याकडे मागील १ वर्षापासुन राहत होती. त्याच कारणांवरुन तो दिनेशबाबत आत्यंतिक द्वेष बाळगुन होता. दिनांक २८/०१/२०२२ रोजी याच कारणावरुन दोघांमध्ये वाद होऊन उदभवलेल्या वादातून आरोपीताने स्वेटरच्या लेसच्या सहाय्याने दिनेश रावते याचा गळा आवळुन जिवे ठार मारुन स्वतःची अटक टाळण्यासाठी पळुन जाण्याच्या तयारीत असताना वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदारांनी त्यास यशस्वीरित्या ताब्यात घेतले आहे.

वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदारांनी कौशल्याने गूप्त बातमीदार व घटास्थळाचे सुक्ष्म निरीक्षणाच्या आधारे खुनाचा गंभीर गुन्हयाची यशस्वीरित्या उकल केली आहे. वालीव पोलसांनी गुन्हा दाखल झाल्यापासुन अवघ्या १२ तासात गुन्हयाची उकल करुन व आरोपीतास ताब्यात घेवून उल्लेखनीय व प्रशंसनीय कामगिरी केली आहे.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक (प्रशासन) श्री. मिलिंद सांबळे, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोउनिरी/प्रशांत चव्हाण, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, पोना. सचिन दोरकर, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, सतिष गांगुर्डे पो.अंम. गजानन गरीबे, सूर्यकांत मुंढे, सचिन खताळ, जयवंत खंडवी, विनायक कचरे यांनी तत्परतेने पार पाडली आहे.